**पिंपरी चिंचवड महानगरपालिका–४११०१८**

**क्रीडा विभाग**

**जाहिर प्रकटन-२०२२-२३**

या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा विभागाचे अंतर्गत सावित्रीबाई फुले अकादमी (S.P.A.) आयट्रेंड लाईफ-३, काळा खडक वाकड येथे सुरू करणेत येत आहे. सदर ठिकाणी प्रशासकीय सेवा परीक्षेचा (U.P.S.C) अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था केलेली असून विद्यार्थ्यांच्या वाचनालय कक्ष व व्याख्यान कक्ष निवासी व्यवस्थेपासून जवळच असणे आवश्यक आहे. त्याकरिता मौजे काळाखडक वाकड या परिसरातील विद्यार्थ्यांकरिता तात्पुरत्या स्वरुपात अंदाजे ३०००-४००० चौ.फुट चा एक हॉल व अंदाजे २००० चौ.फुटचा एक हॉल तातडीने भाडे कराराने तात्पुरत्या स्वरुपात (५ वर्ष कालावधीसाठी) घ्यावयाचे आहे. तथापि सर्व नागरिकांना या जाहीर प्रकटनाद्वारे आवाहन करण्यात येते की, काळाखडक,वाकड परिसरात सावित्रीबाई फुले अकादमी (S.P.A.),क्रीडा विभाग यांचे वापरकरिता वरीलप्रमाणे हॉल मनपास भाडे कराराने देण्यास इच्छुक असलेल्या नागरिक / संस्था यांनी आपल्या जागेच्या मालकी कागपत्रासह भाडेदरासह आपले अर्ज बंद पाकीटामध्ये दोन लिफाफा पद्धतीने मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८ यांचे नावे क्रीडा विभाग साईकृपा कमर्शियल कॉम्प्लेक्स पी.सी.एम.सी. बिल्डींग (३ रा मजला) के.एस.बी.कंपनी समोर मुंबई पुणे रोड खराळवाडी, पिंपरी -४११०१८ येथे दि.२९/१२/२०२२ ते दि.०६/०१/२०२३ या काळात (सार्वजनिक व साप्ताहिक सुट्ट्या वगळून) स.१०.०० ते सायं. ५.०० या वेळेत क्रीडा विभागाकडे समक्ष सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरचे जाहीर प्रकटन आणि सविस्तर अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहणेसाठी उपलब्ध आहे.

**सही/-**

(शेखर सिंह)

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका–४११०१८

## क्रीडा विभाग

### अटी व शर्ती (जाहीर प्रकटन२०२२-२३ चे लगत)

१) सावीत्रीबाई फुले अकादमी (S.P.A.)च्या विद्यार्थ्यांच्या आयट्रेंड लाईफ-३,काळा खडक,वाकड या निवास स्थानापासून ५०० मीटर अंतराच्या परिघात असणारे वाचनकक्ष (१२० विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था) व व्याख्यानकक्षाकरीता(१२० विद्यार्थ्यांकरिता बैठक व्यवस्था) हॉल पूर्ण फर्निचरसह ,सर्व खिडक्यांना पडदे असावेत तसेच वाचनकक्ष हे ध्वनी प्रतिबंधित असावे.

२) विद्युत विषयक सुविधा व स्वच्छ पाणीपुरवठा सुविधा असाव्यात.

३) मुले व मुलींकरिता वेगवेगळी स्वच्छतागृह असावे.

४)वाहनांसाठी समर्पित पार्किंग सुविधा किमान ६० दुचाकी.

५) इमारत बहुमजली असल्यास लिफ्ट ची व्यवस्था असावी.

६)बांधकाम पूर्ण झाल्याचे मनपा कडील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७) सदर इमारतीमध्ये लिफ्ट,बांधकाम किंवा विद्युत इत्यादीमुळे अपघात, वित्त, जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी हॉल मालकाची राहील. यामध्ये मनपाचा काही संबंध राहणार नाही.

८) स्वीकृत केलेल्या जागे मालकासोबत नोंदणीकृत करारनामा वेगळ्याने केला जाईल सदर करारनाम्यातील अटी व शर्ती प्रचलित भाडेकरारनाम्याप्रमाणे राहतील व त्याचा खर्च दोन्ही पक्षांना समान राहील.

९) सदर इमारत मनपा नियमावलीप्रमाणे बांधण्यात आलेली असावी.

१०) वरील बाबींचा विचार करता जागा मालकाने चटई क्षेत्र नमूद करून आपला भाडे प्रस्ताव द्यावा.

११)भाडेदर निश्चित झाल्यावर प्रचलित दराने मनपा कडून GST अदा केला जाईल.त्यामुळे भाडेदर देताना GST वगळून भाडेदर द्यावेत.

१२) करारनामा कालावधी ६० महिन्याचा राहील.

१३) जर महानगरपालिकेला सदर जागेची आवश्यकता न भासलेस ३ महिने अगोदर कळविण्यात येईल.

१४) शैक्षणिक वर्षाच्या मध्ये कोणत्याही कारणास्तव ताबा देता येणार नाही.

१५) दरवर्षी ५% भाडेवाढ अनुज्ञेय राहील.

१६) वरीलपैकी काही आणि कसे जरी असले तरी सदरील वाचनकक्ष व व्याख्यानकक्ष इमारत मा.आयुक्त व मा.अति.आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अभ्यासपूर्ण वातावरणाच्या दृष्टीने पसंत पडणे आवश्यक आहे.तसेच सदर जाहीर प्रकटनाचे कोणतेही कारण न देता रद्द करणे ,पूर्णतः अथवा अंशतः मंजूर वा नामंजूर करणेचे संपूर्ण अधिकार मा.आयुक्त सो पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील.

१७) भाडे शुल्क आणि ठेव - पी.सी.एम.सी मालकाला देय देईल ,त्या सुविधेच्या वापरासाठी व्याजमुक्त परतावा योग्य सुरक्षा ठेव .भाडे शुल्काची रक्कम भाड्याच्या संबंधित महिन्याच्या पहिल्या सात दिवसात देय राहील.भाड्याच्या ठेवीची रक्कम भाडे शुल्काच्या रकमेच्या ३ महिनेपेक्षा जास्त नसावी.

१८) देखभाल शुल्क – जागेच्या संदर्भात सर्व दर ,कर,आकारणी,मुल्यांकन,देखभाल शुल्क ,नॉन ऑक्युपंसी चार्जेस इत्यादीसह सर्व खर्च मालकाने भरावे.

१९) वीज शुल्क - पी.सी.एम.सी वीज शुल्क भरेल.वर वापरलेल्या उर्जेसाठी थेट बिले परवानाकृत सेंटर वर भरेल व मालकास मुळ पावत्या सादर केल्या जातील.

२०) वाचनकक्ष विद्यार्थ्यांसाठी चांगल्या प्रकारे प्रकाशित ,आभ्यासासाठी योग्य असावा

२१) वाचनकक्ष व व्याख्यानकक्षाची किरकोळ देखभाल दुरुस्ती म्हणजेच ट्यूब,बल्ब,पंखे ,नळाची चावी/तोटी व प्लंबिंग संबंधी किरकोळ दुरुस्ती पी.सी.एम.सी मार्फत केली जाईल त्यामध्ये कोणताही मोठा फेरबदल करणार नाही. तसेच वरील नमूद केलेल्या दुरुस्त्या वगळता सर्व दुरुस्त्या मालकाला कराव्या लागतील.

२२) वाचनकक्षामध्ये १२०विद्यार्थ्यांची टेबल व खुर्च्यांच्या स्वरुपात बैठक व्यवस्था असावी.

२३) सभागृह अभ्यासादरम्यान उपद्रव आणि विद्यार्थ्यांना त्रास देणाऱ्या उपक्रमापासून मुक्त असावे.

२४) वाचनकक्ष व व्याख्यानकक्षाचे संपूर्ण क्षेत्र व्यापण्यासाठी सभागृहाला पुरेशा प्रमाणात पंखे दिलेले असावे.

२५) वाचनकक्षामध्ये पुरेशा प्रमाणात विद्यार्थ्यांसाठी लॉकर असावेत.

२६)सदर इमारतीचा शासकीय विमा काढलेला असावा.

२७) वाचनकक्ष व व्याख्यानकक्षाकरिता भाडेतत्वावर घेणेत येणाऱ्या इमारतीचे बांधकाम हे १५ वर्षांपेक्षा जुने नसावे.

२८) वाचनकक्ष व व्याख्यानकक्षाकरिता भाडेतत्वावर घेणेत येणाऱ्या इमारतीबाबत मालकी हक्कांबाबत विवाद निर्माण झालेस त्याची सर्वस्वी जबाबदारी वाचनकक्ष व व्याख्यानकक्ष मालकाची राहील व विवाद सोडविला न गेल्यास मालकाची अनामत रक्कम जप्त केली जाईल तसेच मालकाला करावयाचा दंड/नुकसान भरपाई ची रक्कम स्वतंत्र समिती नेमून ठरविली जाईल.

२९) अंदाजे ३०००-४००० चौ.फुट चा एक हॉल उपलब्ध नसलेस अंदाजे २००० चौ.फुट चे दोन हॉल उपलब्ध असलेस तसा प्रस्ताव द्यावा.

३०) हॉल ची निवड ही हॉल ची गुणवत्ता निकष तपासून त्यामध्ये पात्र आढळल्यास आर्थिक लिफाफा क्र.२ उघडला जाईल.

३१)प्रत्येक लिफाफ्यावर लिफाफा क्र.,विषय व मालकाचे/संस्थेचे नाव टाकणे आवश्यक राहील.

३२)पिंपरी चिंचवड महानगरपालिका पायाभूत सुविधा व फर्निचर सहित दर मागवीत आहे .तथापि दर देताना फर्निचर सहित व फर्निचर विरहित अशा दोन्ही पद्धतीने दर नमूद करावेत.

## <u>व्याख्यानकक्ष/वाचनकक्षासाठी तांत्रिक मुल्यांकन</u>

| अ.क्र. | निकष | कमाल गुण | सहाय्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|
| A | **<u>लेक्चर हॉलची आवश्यकता</u>** | **६०** | |
| १ | विद्यार्थ्यांसाठी हॉल निवास व्यवस्थे जवळ असेल.निवासस्थानाच्या सर्वात जवळची जागा असेल त्यांना सर्वोच्च गुण दिले जातील आणि इतरांना उलट प्रमाणात गुण मिळतील | २० | रेखांश आणि जागेचा अक्षांश |
| २ | वाहनांसाठी समर्पित पार्किंग सुविधा<br>किमान ६० दुचाकी | १० | मूल्यांकन समिती द्वारे भेट दिल्यानंतर पुष्टी करणेत येईल. |
| ३ | शैक्षणिक संस्थेमध्ये असणाऱ्या परिसराला अतिरिक्त गुण दिले जातील. | १० | संस्थेचे वैध प्रमाणपत्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | आवश्यक पायाभूत सुविधा आधीच उपलब्ध आहेत(पाणी,प्रकाशव्यवस्था,स्वच्छतागृहे इ.) | २० | साइट निरीक्षणानुसार |
| B | **साइट तपासणी आणि व्यवहार्यतेवर आधारित** | **४०** | |
| १ | रस्ता जोडणी | १० | साइट निरीक्षणानुसार |
| २ | विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता,आभ्यासाच्या दृष्टीने वातावरण | १० | साइट निरीक्षणानुसार |
| ३ | जागेची स्वच्छता | १० | साइट निरीक्षणानुसार |
| ४ | प्रस्तावित फर्निचर, इलेक्ट्रिकल, प्लंबिंग,पडदे,ध्वनी प्रतिबंधित वाचनकक्ष ई.<br>तपशील | १० | प्रस्तावानुसार |

टीप: आर्थिक बोली उघडण्यासाठी पात्र होण्यासाठी बोलीदाराने किमान ७० गुण मिळवले पाहिजेत.

**सही/-**

(शेखर सिंह)

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

# <u>लिफाफा क्र.१</u>

**क्रीडा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी. ४११०१८**
**साईकृपा कमर्शियल कॉम्प्लेक्स पी.सी.एम.सी. बिल्डींग (३ रा मजला)**
**के.एस.बी.कंपनी समोर मुंबई पुणे रोड खराळवाडी,पिंपरी -४११०१८ .**

Email-sports@pcmcindia.gov.in

==============================================================

दिनांकः- /१२/२०२२

## अर्ज नमुना

मालकाचे /संस्थेचे नाव –

पत्ता –

ईमेल आय.डी -

आधारकार्ड नं.-

पॅनकार्ड क्र.–

दूरध्वनी क्र.-

GST नं. -

| अ.क्र. | मालकाचे/संस्थेचे नाव | हॉल/जागेचा पत्ता | एकूण क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| | | | |

**सोबत जोडावयाची कागदपत्रे**

१) हॉल/जागा मालकीचे प्रमाणपत्र

२) मालमत्ता कर भरलेबाबतची अद्ययावत पावती

३) आधारकार्ड

४) पॅनकार्ड

५) GST नोंदणी प्रमाणपत्र

६) मनपा कडील सदर हॉलचे बांधकाम चालू करणे व बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

ठिकाण –

दिनांक -

मालक/संस्था सही

नाव---------------------

पत्ता ---------------------

शिक्का---------------------

# लिफाफा क्र.२

क्रीडा विभाग ,पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी ४११०१८
साईकृपा कमर्शियल कॉम्प्लेक्स पी.सी.एम.सी. बिल्डींग (३ रा मजला)
के.एस.बी.कंपनी समोर मुंबई पुणे रोड खराळवाडी,पिंपरी -४११०१८ .
Email-sports@pcmcindia.gov.in

==========================================================

दिनांकः- /१२/२०२२

प्रति
मा.आयुक्त सो.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

विषय – वाचनकक्ष व व्याख्यानकक्षाचे दरपत्रक

| अ.क्र. | मालकाचे/संस्थेचे नाव | हॉल/जागेचा पत्ता | एकूण क्षेत्रफळ | चटई क्षेत्र प्रति.चौ.फुट दर | | एकूण भाडे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | फर्निचर सहित | फर्निचर विरहित | |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

ठिकाण –

दिनांक -

मालक/संस्था सही

नाव---------------------

पता ---------------------

शिक्का---------------------

टीप - पिंपरी चिंचवड महानगरपालिका पायाभूत सुविधा व फर्निचर सहित दर मागवीत आहे .तथापि दर देताना फर्निचर सहित व फर्निचर विरहित अशा दोन्ही पद्धतीने दर नमूद करावेत.